**(साक्षीदार पोलीस ठाणे, औसा, जि. लातूर येथून दुरचित्रवाणीव्दारे हजर)**

सरकारपक्षातर्फे सरतपासणी **साक्षीदार क्र.०५**

मी याव्दारे शपथपूर्वक निवेदन करते की,

माझे नाव – **कृष्णा भागीनाथ घायवट,**

वय – ४२ वर्षे,

व्यवसाय – सहायक पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, औसा, जि. लातूर.

राहणार – औसा, जि. लातूर.

**सरतपास सरकारपक्षातर्फे श्री. ए.एन. गिराम, सरकारी वकील**

०१) दिनांक २७.०३.२०२५ रोजी मी सहायक पोलीस निरीक्षक म्हणून पाथरी पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. त्यादिवशी, गुन्हा नोंदणी क्र.१५२/२०२५, कलम १३७(२) बी.एन.एस. अन्वये तपास माझ्याकडे देण्यात आला. मी घटनास्थळी भेट देवून घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.५४) प्रमाणे तयार केला. मी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. पीडित मुलगी (सा.क्र.२) अल्पवयीन असल्यामुळे मुख्याध्यापकांना पत्र (नि.क्र.६६) देवून निर्गम उतारा (नि.क्र.६७) हस्तगत केला. तपासामध्ये आरोपी क्र.२ याचा शोध लागला. तो नाशिक येथे होता. त्याने दिलेल्या माहितीवरून आरोपी क्र.१ व पीडित मुलगी (सा.क्र.२) हे दोन्हीही डोंबिवली, मुंबई येथे राहतात अशी माहिती प्राप्त झाली. दिनांक १०.०४.२०२५ रोजी डोंबिवली येथून आरोपी क्र.१ व पीडित मुलगी (सा.क्र.२) यांना ताब्यात घेतले. डोंबिवली येथील आरोपी क्र.१ व पीडित मुलीचा राहायच्या घराचा पंचनामा (नि.क्र.५९) प्रमाणे तयार केला.

*०१.०७.२०२६*
*विशेष न्यायाधीश, परभणी.*

०२) पाथरी येथे पीडित मुलीचा (सा.क्र.२) जबाब नोंदविला. सदरहू जबाबप्रमाणे आरोपी क्र.१ याने पीडित मुलगी (सा.क्र.२) अल्पवयीन असतांना सुध्दा तिच्यासोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले म्हणून, गुन्ह्यामध्ये कलम ६४(२)(i)(m), ९६, ३(५) बी.एन.एस. आणि कलम ४, ८, १२ बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्याप्रमाणे कलमवाढ करण्यात आली. पीडित मुलगी हिचे कपडे दोन पंचासमक्ष जप्त केले. मला आता पंचनामा दाखविला, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सुध्दा सही आहे. सदरहू पंचनामाला **नि.क्र.७५/पी.डब्ल्यू.०५** देण्यात आला. पीडित मुलीला वैद्यकीय तपासणीकरिता पाठविले. पीडित मुलीचा वैद्यकीय अहवाल हा नि.क्र.५७ प्रमाणे आहे.

०३) आरोपी क्र.१ व २ यांचा सहभाग निष्पन्न झाल्यामुळे दिनांक १८.०४.२०२५ रोजी दोन्ही आरोपींना अनुक्रमे नि.क्र.६१ व ६२ प्रमाणे अटक केली. आरोपी क्र.१ याचा वैद्यकीय अहवाल (नि.क्र.५८) प्राप्त केला. जप्त केलेला मुद्देमाल हा पत्र देवून रासायनिक विश्लेषणाकरिता नांदेड येथील प्रयोगशाळेमध्ये पाठविला. ते पत्र आता मला दाखविले, त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदरहू पत्रास **नि.क्र.७६/पी.डब्ल्यू.०५** देण्यात आला. एकंदरित तपासामध्ये असे निष्पन्न झाले की पीडित मुलगी ही अल्पवयीन असतांना सुध्दा आरोपी क्र.१ याने तिला लग्नाचे आमिष दाखवून मोटारसायकलवर पळवून नेले. आरोपी क्र.१ याने पीडित मुलीवर लैंगिक अत्याचार केला व आरोपी क्र.२ याने सदरहू गुन्ह्यामध्ये आरोपी क्र.१ याला सहकार्य केले. मी दोषारोपपत्र दाखल केले. दोन्ही आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत. मी त्यांना ओळखतो.

*०१.०७.२०२६*

*विशेष न्यायाधीश, परभणी.* *2/3*

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री. के.व्ही. चव्हाण, वकील</u>**

०४) ज्या शेतामधून अल्पवयीन मुलीला पळवून नेले त्या शेताच्या आजूबाजूला कोणीही नव्हते म्हणून, मी त्यांचे जबाब नोंदविले नाही. मी पीडित मुलीकडून आरोपीने घेवून दिलेला मोबाईल जप्त केला नाही. आरोपीचा मोबाईल हस्तगत केला होता. त्यामध्ये आरोपी क्र.१ व पीडित मुलीचे फोटो होते. ते मी अभिलेखावर दाखल केलेले आहेत. आरोपी क्र.१, आरोपी क्र.२ व पीडित मुलगी (सा.क्र.२) हे एकमेकांच्या संपर्कात होते हे दाखविण्याकरिता मी आरोपी क्र.२ याचा मोबाईल हस्तगत केला नाही.

०५) पीडित मुलीच्या जन्माच्या नोंदीचे प्रमाणपत्र हस्तगत करण्याकरिता ग्रामसेवक बोरगव्हाण यांना पत्रव्यवहार केला होता परंतू, तिची जन्माची नोंद नव्हती. तिची जन्माच्या नोंदीबाबत शासकीय कार्यालयामध्ये नोंद आहे याबाबत चौकशी केली होती परंतू, नोंद मिळून आली नाही. हे म्हणणे खरे नाही की पीडित मुलीचे वय मी तिच्या आई–वडिलांच्या सांगण्याप्रमाणे लिहिलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपी व पीडित मुलीचे कपडे जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी पीडित मुलीच्या आई–वडिलांच्या सांगण्यावरून एकतर्फी तपास करून खोटे दोषारोपपत्र दाखल केले आहे.

फेरतपास नाही.

वा.दा.ब.अ.क.केले. श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा./–

(आर.एम.सादराणी)

दिनांक – ०१.०७.२०२६ विशेष न्यायाधीश, परभणी.

*०१.०७.२०२६*

*विशेष न्यायाधीश, परभणी.*